नवि-२९

<u>विकास योजना-कल्याण-डोंबिवली महानगरपालिका</u>

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या मंजूर सारभूत बदलाच्या (EP) अधिसुचनेतील नोट-बी मधील नोंदीनुसार ई.पी.१० आ.क्र. ६८ च्या क्षेत्रामधून अस्तित्वातील अधिकृत बांधकामाचे क्षेत्र वगळणे बाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२**
शासन निर्णय क्र. टिपीएस-१२१२/५२४/ प्र.क्र. १०३/१२/नवि-१२
दिनांक : - १९ ऑगस्ट, २०१५.

**<u>शासन निर्णय:-</u>** सोबतची शासकीय अधिसुचना (मराठी व इंग्रजी) महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**(सुनिल फाटक)**
**कार्यासन अधिकारी**

प्रति,

१) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
२) आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.
३) संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) सहसंचालक तथा सह सचिव,(नगर रचना), यांचे स्विय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२.
५) सहसंचालक, नगर रचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
६) सहायक संचालक नगर रचना, ठाणे शाखा, ठाणे.
७) व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई.

(त्यांना विनंती की, सोबतची शासकीय अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्राच्या भाग-१ कोकण विभागीय पुरवणीमध्ये प्रसिध्द करुन त्यांच्या प्रत्येकी ५ प्रती या विभागास, आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, कल्याण, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे, सहसंचालक, नगर रचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई व सहाय्यक संचालक, नगर रचना, ठाणे शाखा, ठाणे यांना पाठवाव्यात.)

८) कक्ष अधिकारी, कार्यासन नवि-२९, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२/- त्यांना विनंती की, सदरहू अधिसुचना विभागाच्या वेब साईटवर प्रसिध्द करावी.
९) निवडनस्ती (कार्यासन नवि-१२)

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**URBAN DEVELOPENT DEPARTMENT**
**4th Floor, Main Building, Mantralaya,Mumbai-400032.**
**Dated :- 19 August, 2015**

**NOTIFICATION**

No. TPS-1212/524/CR-103/12/UD-12,

Maharashtra Regional and Town planning Act, 1966

And whereas, the Government of Maharashtra vide Urban Development Department's Notification No. TPS-1207/604/C.R. 494/08/UD-12, dated 14th September, 2009 (hereinafter referred to as "the said Notification") has sanctioned the Excluded Parts of Development Plan (hereinafter referred to as "the said Development Plan")of Kalyan- Dombivali Municipal Corporation (hereinafter referred to as "the said Municipal Corporation") and which came into force from 1st October, 2009.

And whereas, while sanctioning the said Excluded Part the Government has taken decision to exclude area under existing authorised structures from reservation of 18 EPs bearing EP No. 9, 10, 14, 17, 18, 19, 20, 24, 25, 29, 30, 33, 34, 37, 38, 41, 42, 45, of sector one Kalyan and 15 EPs bearing EP No. 2, 3, 4, 5, 6, 11, 14, 16, 17, 22,23, 24, 27, 29, 34 of sector two of Dombivali. However the provision has a condition for the concerned land ownesr to submit the proofs showing that the structure mentioned in above EP No. is authorised within one year from the date of this Notification;

And whereas, the above mentioned decision is mentioned in Note (B) of the said Notification .

And whereas, after excluding the areas under existing authorised strutures the remaining area of the reservation No. 68 is reserved for parking (hereinafter referred to as "the said reservation") as per EP No. 10 of the said Development Plan;

And whereas, the concern land owners of the said reservation vide letter dated 9/12/2010 requested Government to delete the said reservation on their land as the constructions on the said land are authorised;

And whereas, after considering reports of Kalyan-Dombivali Corporation and Director of Town Planning, Government is of the opinion to delete approximate 453 sq. mt. of land having authorised structure (as

shown by A-B-C-D in the attached Part Plan) out of total 1400 sq. mt. of the said reservation of Parking and to include the same in Recidential Zone as per the Note B of the said Notification.

And Therefore boundaries of the said reservation are changed as per the Note B of the said Notification. Following entry shall be inserted after the last entry of the said Notification.

**ENTRY**

" The Area measuring approximately 453 sq. mt. bounded by A-B-C-D ( as shown in the part plan attached ) out of total 1400 sq. mt. of reservation No. 68 in EP-10 is deleted from reservation of parking and the area so deleted is included in Residential Zone."

**Note :-**

(A) Copy of the partplan showing above said modification as sanctioned by the Government shall be kept open for inspection of the general public in the following offices during office hours on as working days for a period of one month.

(i) The Commissioner, Kalyan-Dombivali Municipal Corporation, Kalyan.

(ii) Joint Director of Town Planning, Konkan Division, Konkan Bhavan, Navi Mumbai.

(iii) Assistant Director of Town Planning, Thane Branch, Thane.

(B) This notification is also available on Government website www.maharashtra.gov.in

**By order and in the name of the Governor of Maharashtra**

**(Sunil Phatak)**
**Section Officer**

१

<u>महाराष्ट्र शासन</u>
**नगर विकास विभाग**
**४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई-४०००३२.**
**दिनांक :- १९ ऑगस्ट, २०१५.**
**अधिसुचना**
**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६**
क्रमांक-टिपीएस-१२१२/५२४/प्र.क्र. १०३/१२/नवि-१२.

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६**

ज्याअर्थी, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या सेक्टर क्र. १ व २ च्या वगळलेल्या क्षेत्राची विकास योजना (यापुढे जिचा उल्लेख "उक्त विकास योजना" असा करण्यात आला आहे.) शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (या पुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे.) चे कलम ३१(१) अन्वये शासन अधिसूचना क्र. टिपीएस-१२०७/६०४/प्र.क्र.४९४/०८/नवि-१२, दिनांक १४/९/२००९ (यापुढे जिचा उल्लेख "उक्त अधिसुचना" असा करण्यात आला आहे.) अन्वये मंजूर केलेली असून ती दिनांक १/१०/२००९ पासून अंमलात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजना मंजूर करताना शासनाने असा निर्णय घेतला होता की, कल्याण येथील सेक्टर क्र. १ मधील ई. पी. क्र. ९, १०, १४, १७, १८, १९, २०, २४, २५, २९, ३०, ३३, ३४, ३७, ३८, ४१, ४२, ४५ एकूण १८ ई. पी. व डोंबिवली येथील सेक्टर क्र. २ मधील ई. पी. क्र. २, ३, ४, ५, ६, ११, १४, १६, १७, २२, २३, २४, २७, २९, ३४ एकूण १५ ई. पी. संदर्भात अधिकृत अस्तित्वातील बांधकामाखालील क्षेत्र आरक्षणातून वगळण्यात येईल. तथापि, याकरीता सबंधित जमिन मालकांनी उक्त अधिसुचनेच्या मंजूरीच्या दिनांकापासून १ वर्षाचे आत या ई. पी. खालील क्षेत्रामध्ये दर्शविलेले बांधकाम अधिकृत असल्याचे पूरावा सादर करणे आवश्यक होते.

आणि ज्याअर्थी, शासनाचा उपरोक्त निर्णय उक्त अधिसुचनेमधील नोट "बी" मध्ये अंतर्भुत करण्यात आली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये ई. पी. १० अनुसार आ.क्र. ६८ मधील अस्तित्वातील अधिकृत बांधकाम वगळता उर्वरित क्षेत्र "पार्किंग" करिता आरक्षित आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त आरक्षण" असा करण्यात आला आहे.)

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाच्या सबंधित जमिन मालकांनी दिनांक ९/२/२०१०च्या पत्राद्वारे उक्त आरक्षणाखाली जमिनीवर अधिकृत बांधकाम असल्याने या जमिनीवरील उक्त आरक्षण वगळावे, अशी शासनास विनंती केली आहे;

आणि ज्याअर्थी, या संदर्भात कल्याण-डोंबिवली महानगरपालिका आणि संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा अहवाल विचारात घेतल्यानंतर उक्त अधिसूचनेमधील नोट "बी" अनुसार आ.क्र. ६८- पार्किंग एकूण १४०० चौ. मी. क्षेत्रापैकी सुमारे ४५३ चौ.मी. क्षेत्र अधिकृत अस्तित्वातील बांधकामाखालील क्षेत्र उक्त पार्किंगच्या आरक्षणातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे.

आणि त्याअर्थी, उक्त अधिसुचनेमधील नोट "बी" अनुसार उक्त आरक्षणाच्या हद्दीमध्ये फेरबदल करण्यात येत आहे आणि त्यासाठी उक्त दिनांक १४/९/२००९ च्या अधिसूचनेच्या फेरबदल सूचीच्या यादीमध्ये शेवटच्या नोंदीनंतर पुढील नवीन नोंद समाविष्ट करण्यात येत आहे.

**नोंद**

"सोबतच्या भाग नकाशामध्ये अ-ब-क-ड या आद्याक्षरांनी दर्शविल्याप्रमाणे ई. पी. नं. १०, आ.क्र. ६८, पार्किंग या आरक्षणापैकी सुमारे ४५३ चौ. मी. क्षेत्र पार्किंग या आरक्षणातून वगळण्यात येत आहे व वगळलेले क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करण्यात येत आहे."

**टिप : -**

(अ) उक्त मंजुर फेरबदल दर्शविणारा भाग नकाशा खालील नमुद केलेल्या कार्यालयामध्ये नागरीकांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेमध्ये एक महिन्याच्या कालावधीसाठी ठेवण्यात आला आहे.

१) आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.

२) सह संचालक, नगर रचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.

३) सहाय्यक संचालक, नगर रचना, ठाणे शाखा, जि. ठाणे.

(ब) सदरहू अधिसूचना ही महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने**

**(सुनिल फाटक)**
**कार्यासन अधिकारी.**